ePaper


“मला भाजपाचा खूप त्रास”; बच्चू कडूंचा गंभीर आरोप!



वर्ष - 7 । अंक - 147 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


आतील पानांत


- एक पंच आणि भारताला सुवर्ण!
- उर्फीनं गुपचूप उरकला साखरपुडा?
- गुजराती मुलाने तुम्हाला स्वातंत्र्य दिले!
- राजीनामा मागणाऱ्याने थोबाड पाहावे!


www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 4 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# शरद पवार गटात ‘इनकमिंग’!

## » अजित पवार गटाला झटका : जयंत पाटलांकडून जोरदार मोर्चेबांधणी

।पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी- चिंचवडचा शरद पवार यांनी दौरा करताच राष्ट्रवादीच्या गटात तिघांनी पक्षप्रवेश केला आहे. त्यामुळे शरद पवार राष्ट्रवादी गटाची ताकद वाढल्याचं बोललं जात आहे. काळेवाडी भागातील मच्छिंद्र तापकीर यांचे चिरंजीव सागर तापकीर, माजी जिल्हा परिषद सदस्य आणि शरद पवारांचे एके काळचे सहकारी अशोक पवार यांचे चिरंजीव उद्योजक राहुल पवार आणि संतोष शिंदे यांनी पक्षप्रवेश केला आहे. मुंबईच्या प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालयामध्ये प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तिघांनी पक्षप्रवेश केला आहे.





राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी नुकताच पिंपरी-चिंचवड शहरातील काही भागांमध्ये दौरा केला.

त्यांचं काही भागांमध्ये राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली जोरदार स्वागत करण्यात आलं. शरद पवारांच्या या दौऱ्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह असून शरद पवार गटामध्ये कार्यकर्त्यांची इन्कमिंग सुरू झाली आहे. त्यामुळे शहरातील अजित पवार गटाला झटका मानला जात आहे.

### माजी नगरसेवक मच्छिंद्र तापकीर शरद पवार गटाकडे...

» अजित पवार गटामध्ये घुसमट होत असल्याने अनेक जण शरद पवार गटात येण्यास इच्छुक असल्याचं यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे यांनी सांगितलं आहे. त्याचमुळे दोन वेळा नगरसेवक आणि माजी विरोधी पक्षनेते राहिलेले मच्छिंद्र तापकीर यांचे चिरंजीव सागर तापकीर, माजी जिल्हा परिषद सदस्य आणि शरद पवार यांची निकटवर्तीय अशोक पवार यांचे चिरंजीव उद्योजक राहुल पवार आणि अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेचे खजिनदार संतोष शिंदे यांनी मुंबईमध्ये प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत शरद पवार गटामध्ये पक्ष प्रवेश केला. यावेळी पिंपरी- चिंचवडमधील युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष इमरान शेख, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे आदी उपस्थित होते.



“ पिंपरी- चिंचवड शहरातील अनेक जण शरद पवार गटात येतील असा विश्वास शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी व्यक्त केला आहे. काही दिवसांमध्ये शरद पवार यांची मोठी सभा घेण्यात येणार आहे. तेव्हा ते पिंपरी- चिंचवडकरांविषयी आपली भूमिका नक्कीच मांडतील.

– तुषार कामठे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी (शरद पवार गट).

# पिंपरीवर समता सैनिक दलाचा दावा!

## » राष्ट्रवादी, भाजपा, शिवसेनेला ‘टेन्शन’ : महायुती अन् महाविकास आघाडीचा उमेदवार कोण?

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

आगामी २०२४ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत समता सैनिक दलाने पिंपरी विधानसभेचा उमेदवार घोषित केला. त्यामुळे राष्ट्रवादी, शिवसेना, भाजपा यांच्यासह आता महाविकास आघाडी आणि महायुतीमध्येही ‘इच्छुकांचे टेन्शन’ वाढणार आहे. कारण, समता सैनिक दल या मतदार संघात निर्णायक भूमिका घेणार, असे राजकीय जाणकारांचे निरीक्षण आहे.



पिंपरी विधानसभेच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही मनोज गरबडे या समता सैनिक दलाच्या सैनिकाची उमेदवारी जाहीर करीत आहोत. पिंपरी विधानसभेत या वेळेस नक्की परिवर्तन घडणार. असे प्रतिपादन समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.भिमराव यशवंत आंबेडकर यांनी केले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, शाई ते लोकशाही या अभियानांतर्गत समता सैनिक दल व भारतीय बौद्ध महासभा (पिंपरी चिंचवड युनिट) यांच्या नेतृत्वाखाली या भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.भिमराव यशवंत आंबेडकर तसेच मनोज गरबडे हे उपस्थित होते. पिंपरी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून महापुरुषांच्या नावाच्या जयघोषात मोटारसायकल व चारचाकी रॅली काढण्यात आली. रॅलीत सहभागी झालेल्या समाजबांधवांनी हातात निळ्या पताका घेऊन व समता सैनिक दलाच्या वेशभूषेत सहभागी झाले होते. सोमवार (दि.०२) शहरातून निघालेल्या भव्य अशा मोटारसायकल रॅलीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.यामध्ये पुरुषांसह महिलांची संख्यादेखील लक्षणीय होती.

### निवडणूक कधीही लागू शकते...

» दरम्यान, पिंपरी येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या मागे असणाऱ्या मैदानावर रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी जनसमुदायाला संबोधित करताना समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.भिमराव यशवंत आंबेडकर यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, देशातील एकंदरीत परिस्थिती पाहता शिक्षण व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, वाढती अराजकता, बेरोजगारी हे देशाला अधोगतीकडे नेणाऱ्या बाबी आहेत. राजकीय उदासीनता यास कारणीभूत आहे. त्यामुळे परिवर्तनासाठी आपले योगदान महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्रात कोणत्याही क्षणी निवडणुका लागण्याची शक्यता आहे. त्यासाठी आपण तयार असायला हवे.

# आयटी नगरीतील नाइट लाइफचा धसका!

## आयटीनगरी वाढलेल्या अवैध धंद्यांमुळे बदनाम होत आहे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आयटीनगरी हिंजवडी अलीकडच्या काळात वाढलेल्या अवैध धंद्यांमुळे बदनाम होत आहे. चहूबाजूंनी असलेल्या रूफटॉप बारचा दणदणाट अन् हुल्लडबाजांमुळे मध्यरात्रीची शांतता भंग पावत आहे.**

अनेक वर्षांपासून एकाचजागी ठाण मांडलेले हिंजवडी पोलिस ठाण्यातील व वाकड एसीपी कार्यालयातील पोलिस अवैध धंद्यांना हद्दपार करण्याऐवजी अभय देत असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे 'आयटी'तील नाइट लाइफला ब्रेक लागणार कधी, असा प्रश्न सर्व सामान्यांना पडत आहे. 'आयटी'तील रस्ते मध्यरात्री बारानंतर झिंगाट झालेल्या तरुण-तरुणींच्या गर्दीने फुलतात. अद्याप 'आयटी' पूर्ण क्षमतेने सुरु नसताना मद्यपींचे अड्डे मात्र गर्दीने ओसंडून वाहतात. म्हाळुंगेतील व्हीटीपी व गोदरेज लेबर कॅम्प म्हणजे पोलिसांचे राखीव कुरण आहे. हद्दीच्या लांब टोकाला असल्याने येथे कोणाचे सहज लक्ष जात नाही. हॉटेल रॅडिसनमागे, लेबर कॅम्प व हिंजवडी गायरानात अनेक अवैध धंदे सुरू आहेत. हिंजवडी



ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर काही बार मध्यरात्री उशिरापर्यंत तर काही बार लपून-छापून २४ तास सुरू असतात. ठाण्याच्या मागील गल्लीत रात्रभर मद्यपींची झुंड येते असते. हॉटेल समोरून बंद दिसल्यास इतरही मार्ग उपलब्ध असतो. पबमुळे रहिवाशांची शांतता भंग पावत आहे. मोठ्याने डीजेचा आवाज धांगडधिंगा अन आरडा-ओरड यामुळे आजूबाजूला राहणारे रहिवासी हैराण झाले आहेत. तक्रारी करूनही काही उपयोग होत नाही. पबमध्ये धांगडधिंगा

> 'पब'मधील आवाजासंदर्भात नियमावली असते; मात्र कोणत्या हॉटेलच्या मोठ्या आवाजाचा रहिवाशांना त्रास होत असेल अन् तशी तक्रार असेल तर लगेच कारवाई केली जाईल, तसेच हिंजवडी हद्दीतील अशा सर्व रूफटॉप बारची तपासणी करून त्यांना समज दिली जाईल.
>
> **- डॉ. काकासाहेब डोळे,** पोलिस उपायुक्त

एकवेळ ठीक आहे पण ते बंद झाल्यावरसुद्धा मद्यधुंद तरुण-तरुणी रस्त्यावर राडा करतात. शुक्रवार ते रविवारपर्यंत हा त्रास नित्याचा झाला आहे. तत्कालीन पोलिस आयुक्त कृष्ण प्रकाश यांनी अवैध धंदे रोखण्यासाठी सामाजिक सुरक्षा पथकाची स्थापना केली होती. त्याच धर्तीवर हिंजवडीतही तथाकथित सामाजिक सुरक्षा पथक कार्यरत असून, हे पथक म्हणजे केवळ 'गोळा-बेरीज' करण्यासाठी असल्याची चर्चा आहे. या पथकातील अधिकारी, कर्मचारी नाममात्र देशी मद्य विक्रेत्यांवर कारवाईचा बडगा उगारतात. कारवाईचा फार्स करून कर्तव्यदक्ष असल्याचे आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना भासवतात. प्रत्यक्षात मात्र महिन्याकाठी मलिदा देणाऱ्या मोठाल्या बारचालकांना अभय दिले जाते.

# तरुण कैद्यांचे नेमके दुखणे काय?

## नऊ जणांवर महिनोंमहिने ससूनमध्ये उपचार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**येरवडा मध्यवर्ती कारागृहातील नऊ कैद्यांवर महिनोंमहिने ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. काही कैदी दहा-पंधरा दिवस कारागृहात जातात आणि पुन्हा प्रकृती अस्वस्थ झाल्याने रुग्णालयात दाखल होतात. तरुण ते मध्यम वयातील कैद्यांचे नेमके दुखणे काय? याचे निदान करण्यात ससून रुग्णालयातील डॉक्टरांना वेळ का लागत आहे, असा प्रश्न पुढे येत आहे.**

ससून रुग्णालयाच्या परिसरात सुमारे दोन कोटी रुपयांच्या ड्रग्जच्या व्यवहारातील आरोपी ललित पाटील याने रुग्णालयातून सोमवारी (ता. २) रात्री पळ काढला. पोलिस आणि रुग्णालय प्रशासन रात्री उशिरापर्यंत त्याची शोधाशोध करत होते. या पार्श्वभूमीवर ससूनमध्ये उपचारासाठी दाखल कैद्यांची माहिती 'सकाळ'ला विश्वसनीय सूत्रांनी दिली. तरुण कैद्यांचे नेमके दुखणे काय? त्यावरून हा प्रश्न आता पुढे येत आहे. पाटील याचे वय ३४ वर्षे आहे. त्याला सहा जून २०२३ रोजी दुपारी अडीच वाजता रुग्णालयात दाखल केले. डॉ. एस. एस. ठाकूर यांचे युनिट त्याच्यावर उपचार करत होते. पाटील याला क्षयरोग झाल्याचे निदान झाले आहे. तसेच, त्याला हार्नियादेखील होता. त्याच्या उपचारासाठी पाटील सहा जूनपासून रुग्णालयात दाखल असल्याची माहिती पुढे आली. याबाबत बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांच्याशी रात्री संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. पाटील याच्यासह आणखी आठ कैद्यांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यातील काही कैदी ऑगस्टपासून रुग्णालयात आहेत. उपचारासाठी त्यांना दाखल केले आहे, निदान काय आहे, एवढे दिवस उपचार का लांबला? असे प्रश्न पुढे येत आहेत. उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल झालेल्यांमध्ये फक्त एकाच रुग्णाचे वय ७२ वर्षे आहे. उर्वरित सर्व रुग्ण ३४ ते ४१ वर्षे वयोगटातील असल्याची माहिती मिळाली. स सून रुग्णालयात उपचार घेत असलेला आरोपी ललित अनिल पाटील (वय ३४) याने पोलिसांना चकवा देऊन पलायन केले.

ही घटना सोमवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली. पाटील याला सोमवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास एक्स रे काढण्यासाठी नेण्यात येत होते. त्यावेळी पोलिसांना चकवा देऊन त्याने पलायन केले. या संदर्भात पोलिस आयुक्त रितेश कुमार म्हणाले, "या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येत आहे. आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल." अमली पदार्थ बाळगल्याच्या गुन्ह्यात ललित पाटील येरवडा कारागृहात शिक्षा भोगत असताना त्याला उपचारासाठी ससून रुग्णालयातील वॉड क्रमांक १६ मध्ये ४ जून रोजी दाखल केले होते.



### 2020 मध्ये 16 किलो मेफेड्रोन जप्त

» रुग्णालयातून सोडल्यानंतर पाटील याला गुन्ह्यात वर्ग करण्यात येणार आहे. पाटील याच्याकडून २०२० मध्ये चाकण येथे १६ किलो मेफेड्रोन जप्त करण्यात आले होते. या गुन्ह्यात त्याला अटक करण्यात आली होती. तेव्हापासून तो न्यायालयीन कोठडीत आहे. आजारी असल्याने तो चार जूनपासून ससून रुग्णालयातील वॉर्ड क्रमांक १६ येथे उपचार घेत आहे, अशी माहिती पोलिसांनी न्यायालयास दिली. ससूनमध्ये दाखल असलेल्या इतर कैद्यांच्या मदतीने आरोपींनी काही गैरप्रकार केले आहेत का? याचा तपास करायचा असल्याने पोलिसांनी न्यायालयाकडे आरोपींच्या पोलिस कोठडीची मागणी केली होती.

# 'भोसरी' स्टेशनचं नाव बदला..!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

मेट्रो रेल्वेला नागरिकांनी उदंड प्रतिसाद दिला असून प्रवाशांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. पण पिंपरी-चिंचवड मुख्यालय ते शिवाजीनगर कोर्ट या मार्गावरील भोसरी स्टेशनवरुन प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळं या मेट्रो स्टेशनचं नाव बदलण्यात यावं अशी मागणी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडनं (महामेट्रो) केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाकडं केली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांमधून जाणारे मेट्रो मार्ग गेल्या एक ते दीड वर्षात दोन टप्प्यात सुरु झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या दोन्ही मार्गांची उद्‌घाटनं झाली. यांपैकी येत्या मार्च महिन्यात पिंपरी ते फुगेवाडी या मार्गावरील मार्गाचं मोदींच्या हस्ते उद्‌घाटन झालं. पण आता प्रवाशी संघटनेनं या मार्गावरील भोसरी स्टेशनचं नाव बदलण्याची मागणी केली आहे. भोसरी स्टेशनचं नाव बदलण्याची मागणी केली जात आहे. भोसरी ऐवजी या स्टेशनचं नाव नाशिक फाटा असं करण्यात यावं, अशी मागणी करण्यात आली आहे. कारण या स्टेशनला भोसरी नाव दिल्यानं प्रवाशांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. हे स्टेशन ज्या ठिकाणी स्थित आहे त्या भागाला नाशिक फाटा नावानं ओळखलं जातं तर भोसरी या ठिकाणाहून पाच किमी दूर आहे. सध्याचं स्टेशन आणि नाशिक फाटा ही ठिकाणी पुणे-मुंबई हायवेवर येतात. तर भोसरी हे ठिकाण पुणे-नाशिक हायवेवर येतं. महामेट्रोनं सांगितलं की, कंपनीनं केंद्रीय मंत्रालयाकडं भोसरी हे नाव बदलण्याची मागणी केली आहे. त्याचबरोबर इतरही काही स्टेशनची नाव बदलण्याची मागणी केली आहे. ज्यामध्ये बुधवार पेठ या स्टेशनचाही समावेश आहे. प्रवाशांनी हे नाव बदलण्याची मागणी संघटनेकडं केली आहे, अशी माहिती महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हार्डिकर यांनी दिली. दरम्यान, भोसरी स्टेशन ज्या लोकसभा मतदारसंघात येतं तिथले खासदार श्रीरंग बारणे हे आहेत. महामेट्रोनं अशा प्रकारची विनंती सरकारकडं केल्याची आपल्याला माहिती नाही, असं त्यांनी म्हटलं आहे. पण महामेट्रोनं याबाबतचा प्रस्ताव आपल्याकडं द्यावा आपण ते सरकारपर्यंत पोहोचवू, असंही त्यांनी म्हटलं आहे.

# बिल्डर विरोधात सदनिकाधारकांचे उपोषण !

## चिखलीतील प्रकार : पाच वर्षांपासून अपूर्ण कामे व गैरसोयीचा आरोप

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखली येथील 'विठ्ठल एम्पायर फेज -2' या सहकारी गृहरचना संस्थेच्या विकसकाविरोधात सदनिकाधारकांनी उपोषण सुरू केले होते. महापालिका प्रशासनाने संबंधित बिल्डरवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे सदर उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला.**



संबंधित बांधकाम व्यावसायिकाने मागील पाच वर्षांपूर्वी पूर्ण केलेले आहे. परंतु, सदर गृह प्रकल्पाच्या विकसकांनी अनेक कामे अर्धवट ठेवलेली आहेत. या सोसायटीला संरक्षक भिंत नाही. सोसायटीला जाण्यासाठी रस्ता नाही. सोसायटीच्या दोन्हीही लिफ्ट बंद अवस्थेत आहेत. सोसायटी सदस्यांना पार्किंगचे वाटप केलेले नाही. सोसायटीमध्ये प्रयोजित गार्डन विकसित केलेले नाही. सोसायटीला कुठलाही प्रकारचं गेट नाही एंट्रन्स नाही. सोसायटीला पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन नाहीत.

विकसकांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने बांधकाम परवानगी मध्ये घालून दिलेल्या अटी शर्ती पूर्ण केलेल्या नाहीत तसेच उर्वरित बांधकाम पूर्ण केल्यामुळे या गृह प्रकल्पाला बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळालेला नाही. पाच वर्षे झाले या गृहप्रकल्पातील सदस्यांची सहकारी गृहनिर्माण संस्था (सोसायटी) स्थापन केली नाही .अशा एक ना अनेक अडचणी या सोसायटीमध्ये आहेत. त्यामुळे सदनिकाधारक त्रस्त आहेत,याबाबत मनपा प्रशासनाकडे तक्रारी देऊनही विकसक समस्या निवारण करत नसल्याचा आरोप चिखली- मोशी- पिंपरी चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी केला आहे. संजीवन सांगळे म्हणाले की, आमच्या न्याय मागण्यासाठी उपोषणाला बसण्यासाठी आम्ही 9 सप्टेंबर 2023 रोजी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माननीय आयुक्त, पिंपरी चिंचवड शहराचे माननीय पोलीस आयुक्त, चिखली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाचे शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, आमदार महेश लांडगे यांना कळवले होते. त्यानुसार,आज महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर आमच्या सर्व महिला भगिनींना घेऊन चिखली- मोशी- पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनच्या नेतृत्वाखाली उपोषणासाठी बसलो होतो.

त्यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, बांधकाम विभागाचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी गृहप्रकल्पाचे विकसक यांनी या वरील सर्व मागण्या मान्य करून सर्व काम करून देण्याचे लिखित आश्वासन दिले. त्यामुळे हे उपोषण स्थगित केले आहे. विकसकांनी दिलेल्या वेळेत जर ही सर्व काम पूर्ण केली नाहीत तर परत या सर्व सदस्यांना घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर आमरण उपोषण करणार आहे.

### बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देताना काळजी घ्या...

» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरातील असे जे काही बांधकाम व्यवसायिक आहेत की, ज्यांनी त्यांचा अगोदरचा गृहप्रकल्प पूर्ण केलेला नाही, त्याची काम पूर्ण केलेली नाहीत. अशा सर्व बांधकाम व्यवसायिकांना त्यांच्या चालू असलेल्या गृहप्रकल्पाचे काम पूर्ण करून बांधकाम पूर्णत्वाचे दाखले घेतल्याशिवाय त्यांच्या नवीन कोणत्याही गृहप्रकल्पास मंजुरी देऊ नये. किंवा चालू असलेल्या कोणत्याही गृहप्रकल्पास बांधकाम पूर्णत्वाचे दाखले देण्यात येऊ नयेत. तसेच या विठ्ठल एम्पायर फेज -2 च्या विकसकावर देखील योग्य ती कारवाई करावी

**-संजीवन सांगळे,**
अध्यक्ष, चिखली- मोशी- पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशन.

---

# तळवडे ते देहू फाटा रस्त्यासाठी पुढाकार!

## आमदार महेश लांडगे यांची मागणी : अत्याधुनिक पद्धतीने रस्त्याचे काम करा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देहू- आळंदी पालखी मार्गावरील तळवडे ते देहु फाटा (चऱ्होली) ही पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत मार्गावर खड्डयांचे साम्राज्य झाले असून, प्रशासनाने अत्याधुनिक पद्धतीने काम करावे, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, देहू- आळंदी पालखी मार्गावरील तळवडे ते देहु फाटा (चऱ्होली) ही पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील मार्गावर चिखली जलशुद्धीकरण केंद्रामध्ये येणारे पाणी आणि शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या लाईनचे काम याच रस्त्यावर झाले आहे. या कामामुळे रस्त्यांवर प्रचंड खड्डे आहेत.

तळेगाव, चाकण एमआयडीसीची रहदारी मोठ्या प्रमाणात याच रस्त्यावर होत असून, तळवडे ते चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉरमधील सर्वाधिक लोकवस्ती या भागात आहे. सध्यस्थितीला किमान १ लाखहून अधिक लोकसंख्येचा हा परिसर आहे.

रस्त्याच्या दुरावस्थेमुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली असून, सर्वसामान्य वाहनचालक, नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे.

तळवडे ते चऱ्होली भागातील वाढते नागरीकरण यामुळे पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करणे अत्यावश्यक आहे, असेही आमदार महेश लांडगे म्हटले आहे.



देहू- आळंदी पालखी मार्गावरील तळवडे ते देहु फाटा (चऱ्होली) रस्त्याच्या कामासाठी आगामी स्थायी समिती सभेत सल्लागार नियुक्तीला मंजुरी द्यावी. तसेच, निविदा प्रक्रिया राबवून अत्याधुनिक पद्धतीने रस्त्याचे काम पूर्ण करावे, अशी आग्रही मागणी आहे. तसेच, या रस्त्यावरील वाहतूक, पार्किग व्यवस्था, संबंधित जोड रस्ते या सर्व बाबींचा सविस्तर प्रकल्प अहवाल आगामी १५ दिवसांत करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत, अशी सूचना केली आहे. यावर सकारात्मक कार्यवाही होईल, अशी अपेक्षा आहे.

**- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

# ‘नारी शक्ती वंदन’ हे पुढले पाऊल!




**जनगणना व मतदारसंघ फेररचनेनंतरच काही मतदारसंघ नव्याने आरक्षित करण्याचे बंधन घटनेनेच घातलेले आहे. ते पाळूनच मोदी सरकारची वाटचाल सुरू आहे.. भारताने जगाचे नेतृत्व करावेच पण भारताचे नेतृत्व महिलांकडे असावे, या इच्छेमुळे महिलांना आरक्षण दिले आहे..**

लोकशाही व्यवस्थेमध्ये कोणत्याही उल्लेखनीय बदलासाठी सहमतीने घेतलेल्या निर्णयाला विशेष महत्त्व असते. यातून परिवर्तनाच्या प्रवासाची सामूहिक भावना दिसून येते. अलीकडेच भारताने जगावर प्रभाव पाडू शकणारे ऐतिहासिक निर्णय पाहिले आहेत – पहिला म्हणजे ‘जी-२०’ अध्यक्षपदाचा एक भाग म्हणून दिल्ली जाहीरनाम्यावर एकमत निर्माण करणे, तर दुसरा म्हणजे ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ (आता राष्ट्रपतींचीही मोहोर उमटल्यामुळे कायदा) संमत होणे. जागतिक भू-राजकारण बहुआयामी अशांततेने ग्रासलेले असताना, ‘लोकशाहीच्या जननी’च्या मुकुटातील हे दागिने शोभावेत असे निर्णय आहेत. संसदेच्या नवीन इमारतीच्या पहिल्याच विधिविषयक कामकाजाने, राष्ट्राच्या प्रगतीसाठी महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाचा मार्ग निश्चित केला आहे. या संकल्पाचे परिवर्तन सिद्धीमध्ये करण्याची हिंमत केवळ मोदी सरकारने दाखवली, हे नमूद करण्याजोगे आहे. प्रातिनिधिक



लोकशाहीत महिलांना त्यांचा योग्य वाटा मिळवून देण्याचा हा २७ वर्षांचा प्रवास आहे. साध्या शब्दांत सांगायचे तर नारी शक्तीचा विद्यमान किमान हिस्सा आपल्या लोकसंख्येच्या जवळपास निम्मा असूनसुद्धा त्यांना लोकप्रतिनिधित्वात स्थान न मिळणे ही कमतरता होती. याच काळात सामाजिक गतिमानतेने महिलांना ‘केवळ दुसऱ्यांचे ऐकणारी नव्हे, तर निर्णय घेणारी व्यक्ती’ असे स्थान मिळालेले आहे. महिलांनी पारंपरिक कल्पनांच्या बंधनांशी यशस्वी सामना करून, प्रत्येक क्षेत्रात देशाचा गौरव वाढवला आहे. तरीही राजकीय क्षेत्रात महिलांना कमी स्थान होते. आता नरेंद्र मोदी सरकारने नैतिक निवडीला प्राधान्य दिले आहे आणि एक ऐतिहासिक उणीव सुधारण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती दाखवली आहे. ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’मुळे संसदेसह राज्यांच्याही विधिमंडळांमध्ये – म्हणजे कायदे घडवण्याच्या क्षेत्रामध्ये – प्रस्तावित केलेली लिंगभाव-समानता यापुढे संतुलित धोरण निर्मितीला चालना देईल. स्वातंत्र्यानंतर महिलांना समान मतदानाचा हक्क देण्यासाठी अमेरिकेला १४४ वर्षे लागली हे दुर्दैवीच म्हणावे लागेल. ब्रिटनमध्ये तर महिलांच्या मताधिकाराची चळवळ सुमारे १०० वर्षे चालवावी लागली- आधी मन वळवणे, मग निषेध असे मार्ग त्या चळवळीने पत्करले आणि अखेर पहिल्या महायुद्धानंतर ब्रिटिश महिलांना मतदान-हक्क मिळाला. आपले पूर्वज दूरदर्शी होते आणि त्यांनी राज्यघटनेतच महिलांसह सर्व भारतीयांना मतदानाचा हक्क मिळवून दिला. आता, स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानंतर, ‘अमृत काला’चा जणू आणखी एक शुभशकुन म्हणून भारताने त्या मतदानाच्या अधिकारातून पुढली झेप घेतली आहे, त्यामुळे संसद आणि विधिमंडळांत महिलांसाठी प्रतिनिधित्वाच्या अधिकाराचा वाटा वाढणारच आहे. घटना-समितीपुढील २५ नोव्हेंबर १९४९ च्या ऐतिहासिक भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्टपणे विचारले होते की, कोण किती काळ विरोधाभासाचे जीवन जगत राहील. सामाजिक आणि आर्थिक असमानतेबद्दल सावधगिरीचा इशारा डॉ. आंबेडकर यांनी त्या भाषणात दिला होता. ते विरोधाभास नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या गेल्या नऊ वर्षांत, गरीब समर्थक आणि लोककेंद्रित हालचालींनी दूर केले आहेत! आजमितीला साडेतेरा कोटींहून अधिक लोक गरिबीतून बाहेर आले आहेत, ही वस्तुस्थिती याचीच साक्ष आहे. ऐतिहासिक ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ हे ‘एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य’ या भावनेची जाणीव करून देणारे आणखी एक पाऊल आहे. राजकारणबाह्य दृष्टिकोनातूनही याकडे पाहाता येते. भारतीय तात्त्विक मूल्ये सांगतात की स्त्रण आणि पौरुषयुक्त गुणांचे परिपूर्ण संतुलन आंतरिक शांती, सुसंवाद आणि वैयक्तिक पूर्तता आणून आत्म-वास्तविकतेची स्थिती निर्माण करते. मानवतेच्या सामूहिक पूर्ततेसाठी आणि कल्याणासाठी स्त्रीवर्गाच्या नैसर्गिक क्षमतेचा वापर करणे आपल्यावर अवलंबून आहे. चिकाटी, सर्जनशीलता, त्याग, समर्पण, लवचीकता आणि विश्वास हे महिलांचे जन्मजात गुण असतात आणि कुठल्याही मॅनेजमेंट डिग्रीविना, कुठल्याही आयआयएममध्ये न जातासुद्धा हे गुण महिलांना नेतृत्वाच्या भूमिकेसाठी सर्वोत्तम बनवतात.

## संपादकीय »

### कोकण कुणाचा नसा?

***रस्ते, रेल्वे यांची इतकी दुर्दशा अन्य प्रांतात खपून गेली असती? आपल्या प्रगतीच्या मार्गावर इतके खाचखळगे का याचा विचार कोकणवासीयांस स्वत:लाच करावा लागणार आहे..***

सैल नियमनांच्या कुडमुड्या भांडवलशाहीत कशास प्राधान्य द्यावयाचे याचे काही पायंडे पडून जातात. ज्यात गुंतवणूक करावयाची, ज्यास महत्त्व द्यावयाचे, ज्याकडे लक्ष द्यावयाचे तो घटक ग्राहक हवा हा यातील मूलभूत नियम. म्हणजे जो समाजघटक हा थेट ग्राहक नसतो, ज्या समाजघटकातील गुंतवणुकीचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष काही फायदे नसतात, त्या घटकाकडे व्यवस्थेचे सहसा लक्ष जात नाही. अशा ठिकाणी शासकीय व्यवस्था हीदेखील बाजारपेठीय व्यवस्थेची गती कशी कायम राहील याच प्रयत्नांत असते. जे जे बाजारपेठ नाही त्यास महत्त्व नाही, असा हा साधा हिशेब. उदाहरणार्थ आदिवासी. हा घटक व्यक्ती म्हणून कोणाचाही ग्राहक नाही तसेच समूह म्हणूनही दखल घेतली जावी अशी त्यांची क्रयशक्ती नाही. हे त्यांच्या सर्वपक्षीय सर्वकालीन रखडत्या विकासामागील कारण.

**राजकारणाच्या पटावरील चाली सतत बदलत राहाव्या लागतात. शह देण्याचा क्षण साधला नाही, तर मातच खावी लागते. राजकीय परिस्थिती सतत बदलती असते. भाजपच्या ‘साम्राज्याला तडे’ जात असल्याचे आठ महिन्यांपूर्वी प्रस्तुत लेखकाने एका लेखात (इंडियन एक्स्प्रेस- १७ फेब्रुवारी) नमूद केले होते. ‘लोकनीती’ने सर्वेक्षणाअंती काढलेला, नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता घटल्याचा निष्कर्ष यांमध्ये त्याचे प्रतिबिंबही दिसले.**

# भाजपची हडेलहप्पी, विरोधक हतबलच

मात्र जून-जुलैपासून आजपर्यंत- म्हणजे अडीच-तीन महिन्यांत भाजपमध्ये उभारी दिसून येते. यामागे आपल्याकडील प्रसारमाध्यमांचा भाबडा राष्ट्रवादही असेल आणि त्यातून ‘जी-२०’ परिषद म्हणजे मोदींचे एकहाती यश किंवा संसदेची नवी इमारत म्हणजे नवे पर्वच असा प्रचारही जाणता-अजाणता झाला असेल; पण प्रतिपक्षाकडे माध्यमांचे लक्ष जाऊ नये, याची खातरजमा करण्याचे कौशल्य भाजपने दाखवले, हेदेखील लक्षात घेतले जावे. संसदेचे विशेष अधिवेशन बोलावून भाजपने राजकीय पटावर नव्या मुद्द्यांच्या नव्या सोंगट्या आणल्या, चर्चांना नवे उधाण आले. ‘एक देश एक निवडणूक’पासून या चर्चांची सुरुवात झाली. या प्रकरणी समिती नेमली गेल्याने तो मुद्दा संपलेला नाही. सत्ताधारी पक्षाची निरंकुशपणे काम करण्याची एकंदर शैली पाहता येत्या काही आठवड्यांत या ना त्या सौम्य प्रकारे एकत्रित निवडणुकाच



जाहीर झाल्या तरीही आश्चर्य नको. पण या मुद्द्यावर ‘इंडिया’ आघाडीतील पक्षांनी, या आघाडीचे घटक नसलेल्या अन्य प्रादेशिक पक्षांना विश्वासात घेणे सुरू केले आहे का, याविषयी कोणतीही स्पष्टता अद्याप नाही. सदोष पद्धतीने राबवलेला निर्णय हा अंतिमत: नुकसानकारकच असतो, ही भूमिकादेखील ‘इंडिया’ला पुरेशा जोरकसपणे मांडता आलेली दिसत नाही. आणखी किमान तीन मुद्द्यांवर विरोधी पक्षांना मूलभूत भूमिका मांडताच येत नसल्याचे सध्या दिसते आहे. ‘समान नागरी कायद्या’ची चर्चा भले संसदेच्या आत पोहोचली नसेल, पण बाहेर ती होते आहे, आदिवासी समाजांमधल्या अस्वस्थतेमुळे भाजपला त्यातील जोखमीची जाणीव झालीही असेल, पण त्या धोक्यांची पर्वा न करता आणि तत्त्व किंवा बारकावे यांची काळजी न घेता भाजप या विषयीचा हवा तसा कायदा आणू शकतो, कारण निर्दोष कायदे करावेत किंवा शुद्ध हेतूने कायदे करावेत असा काही पक्षाचा फारसा आग्रह नसतो. भाजपची वाट इथे निसरडी असेल, पण विरोधी पक्षांनी तरी, राज्यघटनेतील समन्यायित्वाची तत्त्वे अमलात आणण्याची आवश्यकता आणि देशभरातील धार्मिक-सांस्कृतिक वैविध्य यांची समाधानकारक सांगड कशी घालणार याविषयी स्पष्ट पवित्रा कुठे घेतला आहे? त्यामुळेच मग, सरकार काय करणार याची वाट पाहून नंतर प्रत्युत्तर ठरवू, अशा कुंठितावस्थेत सध्या हे पक्ष दिसतात. अशा परिस्थितीत, या पक्षांवर ‘लांगूलचालना’चा आरोप करणाऱ्यांचे आणखीच फावते.दुसरा मुद्दा महिला आरक्षण विधेयकाचा. ज्या स्वरूपात हे विधेयक मांडले जाऊन मंजूर झाले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# दसरा मेळावा शिवाजी पार्कमध्येच घेण्यासाठी उद्धव ठाकरे गट आक्रमक!

## मनपा सहाय्यक आयुक्तांना दोन दिवसांचा अल्टिमेटम

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या वर्षी प्रमाणे या वर्षी देखील शिवाजी पार्क मैदानावरील शिवसेनेच्या सभेवरुन वाद निर्माण झाला आहे. शिवाजी पार्कवर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची सभा होणार की उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची सभा होणार? याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.**

या दसरा मेळाव्याच्या सभेला शिवाजी पार्क मैदानासाठी ठाकरेंची शिवसेना चांगलीच आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. यासाठी उद्धव ठाकरे गटाने मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्तांना दोन दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. तसेच पुन्हा एक पत्र देखील आयुक्तांना पाठवले आहे. या संदर्भात लवकर निर्णय न झाल्यास पुढील भूमिका घेणार असल्याचे उद्धव ठाकरे गटाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.



शिवाजी पार्कवरील ऐतिहासिक दसरा मेळाव्यासाठी शिवसेनेच्या दोन्ही गटांनी परवानगी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे गेल्या वर्षीप्रमाणे या वर्षी देखील मुंबई महानगर पालिका प्रशासनासमोर पेच निर्माण झाला आहे. यंदा शिवाजी पार्क मैदान आमच्याच गटाला मिळावे, यासाठी दोन्ही गट आग्रही आहेत. त्यामुळे दोन्ही गटाने आप-आपला दावा मजबूत असल्याचे सांगितले आहे. शिवाजी पार्क आपल्याला दसरा मेळाव्यासाठी मिळावे, यासाठी महिन्याभरापूर्वीच एक पत्र बीएमसी विभागीय कार्यालयाला पाठवण्यात आले आहे. आता याच पत्रावर निर्णय घेण्याआधी मुंबई महापालिका विधी विभागाचे मार्गदर्शन मागवले आहे. शिवसेनेचा दसरा मेळावा ही शिवसेनेची खास ओळख आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे या मेळाव्याला ऐतिहासिक स्वरुप प्राप्त झाले आहे. 2021 पर्यंत दसरा मेळावा म्हणजे, शिवसेनेचाच आणि शिवाजी पार्कवर आवाज कुणाचा तर ठाकरेंचा हीच ओळख होती. पण शिवसेना फुटली आणि दसरा मेळाव्याला वादाचे ग्रहण लागले. गेल्या वेळी देखील मुंबईत दोन दसरा मेळावे झाले होते. यंदा मात्र, पुन्हा एकदा याला वादाची किनार लागली आहे.

### पालिका प्रशासनासमोर पेच

» शिवाजी पार्कवरील ऐतिहासिक दसरा मेळाव्यासाठी शिवसेनेच्या दोन्ही गटांनी परवानगी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे गेल्या वर्षीप्रमाणे या वर्षी देखील मुंबई महानगर पालिका प्रशासनासमोर पेच निर्माण झाला आहे. यंदा शिवाजी पार्क मैदान आमच्याच गटाला मिळावे, यासाठी दोन्ही गट आग्रही आहेत. त्यामुळे दोन्ही गटाने आप-आपला दावा मजबूत असल्याचे सांगितले आहे. शिवाजी पार्क आपल्याला दसरा मेळाव्यासाठी मिळावे, यासाठी महिन्याभरापूर्वीच एक पत्र बीएमसी विभागीय कार्यालयाला पाठवण्यात आले आहे.

# राजीनामा मागणाऱ्याने आपले थोबाड पाहावे!

## राजीनामा मागणे ही राजकिय मागणी : आ. बच्चू कडू

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नांदेडमध्ये २४ तासांत २४ रुग्णांचा मृत्यू झाला. या प्रकरणावर संतप्त प्रतिक्रिया समोर येत आहेत. दरम्यान, माजी राज्यमंत्री आमदार बच्चू कडू यांनीही या प्रकरणी प्रतिक्रिया देत एखाद्या आमदाराचे ज्यापद्धतीने उपचार होतात. त्यापद्धतीने मत देणाऱ्याचे उपचार का होत नाही, असा सवाल बच्चू कडू यांनी केला आहे.**



### स्वत: त्यांच्या काळात काय केले

» आज एखाद्या आमदाराला चांगले उपचार मिळतात. पण मत देणाऱ्याला का चांगले उपचार मिळत नाही. येथे भोंग्याचे प्रश्न मोठे का होतात, असा सवालही बच्चू कडू यांनी उपस्थित केला आहे. तर आरोग्यमंत्र्यांचा राजीनामा मागणाऱ्यांनी पहिले स्वतःचे थोबाड पाहावे. त्यांनी स्वतः त्यांच्या काळात काय केले, ते पाहावे. त्यांनी राजीनामा मागून राजकारण करू नये, असेही बच्चू कडू म्हणाले.

आरोग्यमंत्र्यांचा राजीनामा मागणे ही राजकिय मागणी आहे. व्यवस्था निर्माण केली पाहिजे. मात्र, ज्याने राजीनामा मागितला त्यांच्या काळात काय सुविधा होती? त्यामुळे राजीनामा मागणाऱ्याने आपले थोबाड पाहावे, असेही बच्चू कडू म्हणाले. बच्चू कडू आज (ता. तीन) अकोल्यात आले असता माध्यमांशी बोलत होते. नांदेड येथील शासकीय रुग्णालयात झालेल्या अक्षम्य दुर्लक्षाप्रकरणी सरकारने दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई तर करावीच. पण आरोग्य विभागाचे प्रमुख म्हणून आरोग्यमंत्र्यांना प्रथम मंत्रिमंडळातून नारळ द्यावा, अशी मागणी माजी गृहमंत्री आमदार अनिल देशमुख यांनी 'X' च्या माध्यमातून केली होती. त्यांच्या मागणीचा बच्चू कडू यांनी खरपूस समाचार घेतला आहे.

नांदेडच्या शासकीय रुग्णालयात २४ तासांत २४ रुग्णांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना सोमवारी (ता. २) समोर आली अन् राज्यभरात एकच खळबळ उडाली. त्यानंतर पुढच्या २४ तासांत पुन्हा सात जणांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं. यामध्ये चार बालकांचादेखील समावेश असल्याची माहिती आहे.

यावर राज्यभरात संतप्त प्रतिक्रिया उमटत असून, माजी राज्यमंत्री बच्चू यांनीही संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. बच्चू कडू म्हणाले, या देशामध्ये जाती-धर्माचे प्रश्न राजकीय लोकांनी आपल्या फायद्यासाठी मोठे केले. स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे झाली. मात्र, अद्यापही आरोग्याचा प्रश्न कायम आहे. शिक्षणसंबंधी प्रश्न कायम आहेत. घर, शेती यांचेही प्रश्न कायम आहेत. प्रत्येक जाती, धर्मात शेतकरी आहेत. त्यामुळे एका शेतकऱ्याचे प्रश्न मिटले असते तर आज आरक्षणाच्या मागण्या झाल्या नसत्या.

# राज्याचे आरोग्य व्हेंटिलेटरवर : राज ठाकरे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात 24 तासात 24 मृत्यू झाल्याच्या घटनेने राज्यात खळबळ उडाली आहे. इतकेच नाही तर मृत्यूचे हे प्रमाण आणखी वाढतच आहे. मात्र, आता या प्रकारानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापताना दिसत आहे.

राज्यातील शिंदे-फडणवीस आणि पवार सरकारवर विरोधकांनी कडाडून टीका केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. तीन तीन इंजिनं लागून पण राज्याचे आरोग्य जर व्हेंटिलेटरवर असल्यासारखी परिस्थिती असेल तर उपयोग काय? असा सवाल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. नांदेडमधल्या सरकारी रुग्णलयात गेल्या 24 तासात 24 मृत्यू झाले. ही घटना अतिशय दुर्दैवी आहे. मध्यंतरी ठाण्यात देखील अशीच घटना घडली. राज्यातल्या सरकारी रुग्णालयांमध्ये औषधाचा तुटवडा आहे. मुंबईत तर टीबीच्या औषधाचा तुटवडा असल्यामुळे 'औषध पुरवून वापरा' असा सल्ला दिला जातोय असं कळतंय. आणि ह्या घटना फक्त नांदेड, ठाणे आणि मुंबईपुरत्या नाहीत तर सर्वत्र आहेत.

तीन तीन इंजिनं लागून पण राज्याचं आरोग्य जर व्हेंटिलेटरवर असल्यासारखी परिस्थिती असेल तर उपयोग काय? सरकारच्या तिन्ही पक्षांनी स्वतःचा पुरेसा विमा उतरवल्यामुळे त्यांना कसलीच काळजी नाहीये पण महाराष्ट्राचं काय? दुर्दैव असं की सरकारमधले तीन पक्ष ठणठणीत सोडून बाकी महाराष्ट्र आजारी आहे अशी परिस्थिती आहे. सरकारने स्वतःच आयुर्मान वाढवण्यासाठीची धडपड कमी करून महाराष्ट्राचं आरोग्य कसं सुधारेल ह्याकडे अधिक लक्ष द्यावं.

# एका गुजराती मुलाने तुम्हाला स्वातंत्र्य दिले!

## » आता दुसरा गुजराती मुलगा विकासासाठी आला आहे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

छत्तीसगडमध्ये जाहीर सभेला संबोधित केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी तेलंगाणामध्ये पोहोचले. निजामाबाद येथे ते म्हणाले की तेलंगाणाला स्वातंत्र्य गुजराती पुत्र सरदार वल्लभभाई पटेल यांनी दिले होते. आता दुसरा गुजराती मुलगा विकासासाठी आला आहे. पीएम मोदी पुढे म्हणाले की, भाजप सरकारने येथील बीआरएस सरकारला विकासासाठी मोठा पैसा पाठवला, पण त्यांनी तो लुटला. आता तेलंगाणात बीआरएसचे सरकार जाणार हे निश्चित आहे.

तेलंगाणातील जनतेनेही काँग्रेसपासून सावध राहण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. संपूर्ण देशाने त्यांना नाकारले आहे. भाजप सर्वसामान्यांसाठी काम करते. तेलंगाणातील जनतेनेही काँग्रेसपासून सावध राहण्याची गरज आहे. संपूर्ण देशाने काँग्रेसला नाकारले आहे. एकदा का काँग्रेसने सत्ता सोडली की त्यांना परतणे कठीण होते. काँग्रेस मतांचे विभाजन करण्याचे काम करत आहे, यासाठी बीआरएसने आपली तिजोरी उघडली आहे.

तेलंगणात बीआरएसचा पराभव निश्चित, त्यांचे जाणे निश्चित. देश स्वतंत्र झाला तेव्हा निजाम अडथळे निर्माण करत होता. भारतात यायला नाखूष होता. तेव्हा सरदार पटेल या गुजराती पुत्राने तुमचे स्वातंत्र्य सुनिश्चित केले. आता तुमच्या विकासासाठी दुसरा गुजराती मुलगा आला आहे. भारत सरकारने तेलंगाणा सरकारला विकासासाठी प्रचंड पैसा दिला, पण बीआरएसने तो लुटला. ही त्यांची परंपरा आहे. तेलंगाणात लाखो कुटुंबांचे हक्क एकाच कुटुंबाने बळकावले आहेत. तेलंगणात आजूबाजूला प्रतिभा आहे. जेव्हा कोरोना महामारीने जगाला थैमान घातले तेव्हा तेलंगाणाने लस बनवून जगाला पाठवली. तेलंगाणातील विकासाची आकांक्षा मी चांगल्या प्रकारे समजू शकतो. मी फक्त ही आवड पाहिली. आज मला तेलंगाणातील लोकांना 8 हजार कोटी रुपयांच्या योजना भेट देण्याची संधी मिळाली आहे. NTPC प्लांट तेलंगाणाच्या विकासाला चालना देणार आहे. या प्लांटमधून तेलंगाणाला सर्वाधिक वीज मिळणार आहे. यामुळे तुमची राहणीमान वाढेल. या प्रकल्पाची पायाभरणी करण्याचे सौभाग्य मला लाभले आणि आता त्याचे उद्घाटन करण्याची संधीही मला मिळाली आहे. त्यामुळे भाजपचा निर्धार सातत्याने दृढ होत आहे. मी एक रहस्य उघड करणार आहे.



### काँग्रेसला हक्क हिरावून घ्यायचे आहेत

» पंतप्रधान मोदी मंगळवारी छत्तीसगडमधील जगदलपूरला पोहोचले. येथे त्यांनी जाहीर सभेला संबोधित केले. यादरम्यान त्यांनी बिहारच्या जात जनगणनेला हात घातला आणि म्हणाले - काँग्रेस म्हणत आहे की लोकसंख्या ठरवेल की पहिला अधिकार कोणाला असेल. आता काँग्रेसला अल्पसंख्याकांचे हक्क कमी करायचे आहेत का? मोदींनी जनतेला विचारले - लोकसंख्येनुसार अधिकार दिले तर अल्पसंख्याकांना हटवायचे आहे का, हे काँग्रेसने स्पष्ट करावे. असे असेल तर सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या हिंदूंनी पुढे येऊन त्यांचे सर्व हक्क घ्यावेत का?

हैदराबाद महानगरपालिकेची निवडणूक झाली तेव्हा भाजपने 48 जागा जिंकल्या. केसीआरला पाठिंब्याची गरज होती. पूर्वी ते माझा खूप आदर करायचे.

विमानतळावर पुष्पहार घेऊन यायचे. आता ते चिडले. ते मला भेटायला दिल्लीला आले, शाल ओढली आणि खूप प्रेम दाखवलं. प्रेम दाखवणे त्यांच्या स्वभावात नाही.त्यांनी एनडीएमध्ये सामील होण्याविषयी विचारले. मी म्हणालो- तुमच्या कृती अशा आहेत, मोदी तुमच्याशी संबंध ठेवू शकत नाहीत.

आम्ही विरोधी पक्षात बसू शकतो, पण तेलंगाणातील जनतेचा विश्वासघात करणार नाही. आम्ही एनडीएमध्ये प्रवेश घेतला नाही. केसीआर म्हणाले होते की आता ते म्हातारे झाले आहेत. आता मुलगा केटीआर तुमच्याकडे आला तर त्याला आशीर्वाद द्या. मी म्हणालो ही लोकशाही आहे.

# राहुल गांधींच्या सेवेला पश्चाताप म्हणू नका

## » राहुल गांधी सुवर्ण मंदिरात सफाईच्या कामात गुंतले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

काँग्रेस नेते राहुल गांधी मंगळवारी पुन्हा एकदा सुवर्ण मंदिरात पोहोचले. येथे त्यांनी लंगर घरातील महिलांसोबत प्रथम भाजीपाला आणि लसूण कापला आणि नंतर भांडी धुतली. सभागृहात जाऊन लंगरचे वाटपही केले. यानंतर जोडा घरात भाविकांचे जोडे हाताळण्याची सेवाही केली.

यापूर्वी, राहुल यांनी सोमवारी मध्यरात्री 12 पर्यंत सेवा बजावली होती. 24 तासांत ते तिसऱ्यांदा सेवेसाठी दाखल झाले. त्याचबरोबर शीख गुरुद्वारा व्यवस्थापन समितीने (SGPC) राहुल यांच्या दौऱ्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. हा पश्चाताप नाही, असे समितीने म्हटले आहे. सोमवार 2 ऑक्टोबर रोजी दुपारी सुवर्ण मंदिरात पोहोचलेल्या राहुल गांधींनी भांडी धुण्याची सेवा केली. तत्पूर्वी त्यांनी सुवर्ण मंदिरात दर्शन घेतले होते. सायंकाळी उशिरा राहुल गांधी पुन्हा सुवर्ण मंदिरात पोहोचले. यादरम्यान त्यांनी परिक्रमेत दीर्घकाळ जलसेवा केली. लोक स्वतः जवळ येऊन त्यांच्याशी बोलत होते आणि पाणीही घेत होते. यादरम्यान राहुल गांधी यांनी पालखी साहिबचे दर्शन घेतले. सोमवारी गुरू घराचे दरवाजे बंद झाल्यानंतर राहुल गांधी सफाईच्या कामात गुंतले. ते कापड पकडून रेलिंग साफ करू लागले. सुवर्ण मंदिरात सेवा करणाऱ्या तरुणांना मदत करताना दिसले. एसजीपीसीचे सरचिटणीस गुरचरण सिंह ग्रेवाल म्हणाले की, शीख प्रतिष्ठेनुसार कोणीही या घरात येऊ शकते. राहुल गांधी यांनी येथे सेवा केली, म्हणून त्यांना ही देग देण्यात आली, मात्र त्यांच्या सेवेला पश्चाताप म्हणणे चुकीचे ठरेल. इथे येऊन त्यांना जे बोलायचे होते ते त्यांनी केले नाही. ते राजकारण होते. ग्रेवाल म्हणाले की राहुल गांधी अशा कुटुंबाचा भाग आहेत ज्यांच्या आजींनी श्री अकाल तख्त साहिब पाडले आणि त्यांच्या वडिलांनी दिल्लीत शीखांची हत्या केली, परंतु श्री अकाल तख्त साहिब उंच आहे. 40 वर्षांपासून ही जखम तशीच आहे. त्यांच्या या सेवेला पश्चाताप म्हणता येणार नाही. ग्रेवाल म्हणाले की, प्रियंका आपले वडील राजीव गांधी यांची हत्या करणाऱ्या नलिनी यांना भेटण्यासाठी तुरुंगात जाऊ शकतात, पण राहुल गांधी दिल्लीत हत्याकांड झालेल्या विधवा वसाहतीत गेले आहेत का, कारण शीख लोक फक्त 2 टक्के आहेत, नलिनी हिंदू होत्या. त्यांची व्होट बँक त्यांना हवी. माकन आणि त्यांच्यासोबत खुर्चीवर बसलेले जगदीश टायटलर हे




### सेवा करणाऱ्या तरुणांना मदत

» सायंकाळी उशिरा राहुल गांधी पुन्हा सुवर्ण मंदिरात पोहोचले. लोक स्वतः जवळ येऊन त्यांच्याशी बोलत होते आणि पाणीही घेत होते. यादरम्यान राहुल गांधी यांनी पालखी साहिबचे दर्शन घेतले. सोमवारी गुरू घराचे दरवाजे बंद झाल्यानंतर राहुल गांधी सफाईच्या कामात गुंतले. ते कापड पकडून रेलिंग साफ करू लागले. सुवर्ण मंदिरात सेवा करणाऱ्या तरुणांना मदत करताना दिसले.

# दिल्लीसह उत्तर भारतात भूकंपाचे धक्के

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



एनसीआरमध्ये मंगळवारी दुपारी भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. दुपारी 2.53 वाजता हे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता 4.6 इतकी होती. भूकंपाचा केंद्रबिंदू नेपाळमध्ये होता. तेथे दोनदा भूकंप झाले. दुपारी 2.25 वाजता पहिला 4.6 रिश्टर स्केलचा होता आणि दुसरा 2.53 वाजता 6.2 रिश्टर स्केलचा होता. उत्तर प्रदेशातही भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. त्याची तीव्रता 5.5 इतकी मोजली गेली आहे.

हरियाणामध्ये मंगळवारी दिवसभरात दुसऱ्यांदा भूकंप झाला. पानिपत, रोहतक, जिंद, रेवाडी आणि चंदीगड आदी भागात दुपारी 2.50 वाजता भूकंपाचे धक्के जाणवले. त्यामुळे अराजकता निर्माण झाली. लोक घराबाहेर पडले. आज सकाळी सोनीपतमध्ये 2.7 रिश्टर स्केलचा भूकंप नोंदवण्यात आला.नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीनुसार, मंगळवारी सकाळी 11.06 सेकंदांनी भूकंप झाला. भूकंपाचा केंद्रबिंदू सोनीपत असल्याचे सांगण्यात येत आहे. पृथ्वीच्या 8 किलोमीटर खाली हालचालींची नोंद झाली आहे. आपल्या पृथ्वीचा पृष्ठभाग प्रामुख्याने 7 मोठ्या आणि अनेक लहान टेक्टोनिक प्लेट्सपासून बनलेला आहे.

या प्लेट्स सतत तरंगत राहतात आणि कधीकधी एकमेकांवर आदळतात. अनेक वेळा टक्कर झाल्यामुळे प्लेट्सचे कोपरे वाकतात आणि जेव्हा जास्त दाब येतो तेव्हा या प्लेट्स तुटू लागतात. अशा स्थितीत खालून बाहेर पडणारी ऊर्जा बाहेर पडण्याचा मार्ग शोधते आणि या गडबडीनंतर भूकंप होतो. दुपारी दोन वाजून २० मिनिटांनी ४.२ रिश्टर स्केलचा पहिला भूकंप झाला. त्यानंतर ६.२ रिश्टर स्केलचा सलग दुसरा भूकंप झाला.

# मलाही ट्रोलिंगचा त्रास होतो : सबा आझाद

अभिनेत्री सबा आझाद सध्या व्हू इज युवर सिंगर या मिनी वेब सीरिजच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. यावेळी तिने एका मुलाखतीत वैयक्तिक आयुष्याविषयी सांगितले. सबाने सांगितले की, तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे तिला सोशल मीडियावर प्रचंड द्वेषाचा सामना करावा लागला आहे. वास्तविक, सबाचे नाव गेल्या काही काळापासून तिच्या कामापेक्षा हृतिक रोशनला डेट केल्यामुळे चर्चेत आहे. हृतिकला डेट केल्यानंतर तिच्याकडे मीडियाचे लक्ष वेधले. सबा म्हणाली - मी खूप खासगी स्वभावाची व्यक्ती आहे. मी क्वचितच बाहेर जाते, मला घरीच वेळ घालवायला आवडते, म्हणून सुरुवातीला जेव्हा मला पापाराझींशी सामना करावा लागला तेव्हा ते खूप भीतीदायक होते. मी खोटं बोलणार नाही. मला अशा प्रकारच्या शो ऑफची कधीच सवय नव्हती. तिच्या वैयक्तिक आयुष्यावर कामाची छाप पडत असल्याबद्दल सबाला खंत आहे. सबाने हृतिकसोबतचे नाते जाहीर केल्यानंतर मिळालेल्या कमेंटबाबतही चर्चा केली. ती म्हणाली, मी दगड नाही. मलाही खूप वाईट वाटते. अनेकवेळा जेव्हा मी उठते तेव्हा मला वाटते की मी कोणाचे काय केले आहे? मी माझे जीवन जगत आहे, तुम्ही तुमच्या जीवनाचा आनंद घ्या. तुम्हाला माझ्या रक्ताची तहान आहे का? पण नंतर मला वाटते की लोक काय विचार करतात यावर मी नियंत्रण ठेवू शकत नाही. हा विचार करून मी स्वतःला शांत केले. माझ्या वैयक्तिक आयुष्यासाठी लोक मला जज करतात पण मी ते बदलू शकत नाही. सबा आणि हृतिकने 2022 च्या सुरुवातीला डेट करायला सुरुवात केली. यानंतर सबा हृतिकसोबत व्हेकेशन, फॅमिली आऊटिंग आणि प्रत्येक सणाच्या सेलिब्रेशनमध्ये दिसली. दोघांमध्ये 12 वर्षांचा फरक आहे. हृतिक 49 वर्षांचा आहे, तर सबा 37 वर्षांची आहे, ज्यामुळे त्यांच्या नात्याला सोशल मीडियावर खूप ट्रोल केले गेले. हृतिकचे पहिले लग्न सुजैन खानसोबत झाले होते. 2014 मध्ये दोघांचा घटस्फोट झाला. रिहान आणि हृधन हे दोघेही सुझान आणि हृतिक यांची मुले आहेत. घटस्फोटानंतर काही वर्षांनी सुझैनने अर्सलान गोनीला डेट करायला सुरुवात केली.



# उर्फी जावेदनं गुपचूप उरकला साखरपुडा?

उर्फी जावेदची वेगळी ओळख सांगायची गरज नाही. ती तिच्या अतरंगी फॅशनमुळे नेहमीच चर्चेत असते. अनेक टेलिव्हिजन शो आणि बिग बॉसमधून तिला प्रसिद्धी मिळाली. मात्र आता त्यानंतर ती तिच्या फॅशनमुळे व्हायरल झाली. आता मात्र उर्फी जावेद एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. उर्फीनं गुपचूप साखरपुडा केल्याच्या बातम्या सध्या चर्चेत आहेत. यावेळी उर्फीचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या फोटोंमुळे ती पुन्हा चर्चेत आली. या फोटोत उर्फी जावेद एका मिस्ट्री मॅनसोबत पूजा करताना दिसतेय. त्यामुळे आता उर्फीचा रोका झाल्याचं बोललं जात आहे. मात्र अद्याप अभिनेत्रीने याबाबत काहीही प्रतिक्रिया दिलेली नाही. या फोटोमध्ये एक व्यक्ती उर्फीसोबत बसलेली दिसतेय. या फोटोमध्ये दोघेही सोबत बसले असून हवन कुंडही फोटोत दिसत आहे. हे फोटो समोर आल्यानंतर नेटकरी आता या फोटोवर प्रतिक्रिया देत आहेत. उर्फी जावेदच्या लुकनेही सर्वांचे लक्ष वेधले आहे. ती काळ्या रंगाच्या सूटमध्ये दिसत आहे. तिने कपाळावर गंध लावलेला दिसत आहे. या फोटोमध्ये उर्फी जावेद मुलाला अंगठी देताना दिसतेय. मात्र तो मुलगा कोण आहे याबाबत काहीही माहिती समोर आलेली नाही. त्याचा चेहरा फोटोत स्पष्ट दिसत नाही. मात्र हा फोटो व्हायरल झाल्यानंतर नेटकरीही हैराण झाले आहेत.



# अभिनेत्री महिमा चौधरीच्या संघर्षाची कहाणी !

अनेक सुपरहिट सिनेमाचा भाग आहे. पण गेल्या काही दिवसांपासून वैयक्तिक आयुष्यामुळे ती मनोरंजनसृष्टीपासून दूर आहे. आता कंगना रनौतच्या (KANGANA RANAUT) 'इमर्जन्सी' या सिनेमाच्या माध्यमातून ती रुपेरी पडद्यावर कमबॅक करत आहे. लग्न, दोनदा गर्भपात, घटस्फोट आणि कॅन्सर अशा सर्व गोष्टींचा सामना केल्यानंतर आता अभिनेत्री रुपेरी पडदा गाजवायला सज्ज आहे. महिमाने 1997 मध्ये आलेल्या 'परदेस' या सिनेमाच्या माध्यमातून अभिनयक्षेत्रात पदार्पण केलं. पहिल्याच सिनेमाने ती लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचली. त्यावेळी अभिनेत्री टेनिसपटू लिअँडर पेसला डेट करत होती. पण त्यांचं नातं फार काळ टिकलं नाही. त्यानंतर महिमाचं नाव अजय देवगणसोबत जोडलं गेलं. करिअर पीकवर असताना महिमाचा भीषण अपघात झाला. 1994 मध्ये ती 'दिल क्या करे' या सिनेमाचं शूटिंग करत होती. या शूटिंगदरम्यान महिमाचा अपघात झाला होता. तिच्या चेहऱ्यालाही मोठी दुखापत झाली होती. त्यानंतर महिमा 2006 मध्ये बॉबीसोबत लग्नबंधनात अडकली. महिमाने 2007 मध्ये अरियाना जन्म दिला. त्यानंतर दोनदा गर्भपात करण्यात आला. पुढे बॉबी आणि तिचं नातं फार काळ टिकू शकलं नाही. 2013 मध्येच त्यांचा घटस्फोट झाला. महिमाची कर्करोगाशी झुंज यशस्वी झाली आहे. महिमा चौधरी एक लोकप्रिय सिने-अभिनेत्री आहे. महिमाचं खरं नाव रितू चौधरी असं आहे. सुभाष घईंच्या 'परदेस' या सिनेमाच्या माध्यमातून महिमाने सिनेसृष्टीत पदार्पण केलं. या सिनेमातील भूमिकेसाठी तिला सर्वोत्कृष्ट पदार्पणासाठी फिल्मफेअर पुरस्कारदेखील मिळाला. त्यानंतर अनेक अनेक हिंदी सिनेमांत काम केलं. आता अभिनेत्रीच्या आगामी सिनेमांची प्रेक्षकांना उत्सुकता आहे.



# गौतमीने आपल्या नृत्याने महाराष्ट्राला वेड लावलं

नेहमीच आपल्या नृत्यामुळे चर्चेत असते. 2022 मध्ये एका कार्यक्रमात आक्षेपार्ह डान्स स्टेप्स करत तिने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. अश्लील अदांमुळे ती वादाच्या भोवऱ्यात अडकली. पण तरीही तिच्या प्रत्येक कार्यक्रमात वाद, गोंधळ होणं सुरुच राहिलं आहे. महाराष्ट्रात गौतमी पाटीलची क्रेझ दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पण ती नक्की आहे कोण? तिची कौटुंबिक पार्श्वभूमी काय? असे अनेक प्रश्न जाणून घेण्याची चाहत्यांना उत्सुकता आहे.



धुळ्यात जन्मलेल्या गौतमी पाटीलचा आज महाराष्ट्रात मोठा चाहतावर्ग आहे. गौतमीचा सांभाळ तिच्या आईने आणि आजोबांनी केला आहे. तिचे वडील व्यसनी असून ते आईला मारहाण करत असे. त्यामुळे तिची आई वडिलांचं घर सोडून माहेरी राहायला आली होती. आपले वडील कोण आहेत? ते काय करतात हे लहानपणी गौतमीला माहीत नव्हतं. गौतमीचा सांभाळ करण्यासोबत घर चालवण्याची जबाबदारीदेखील तिच्या आईने सांभाळली होती. पण एकदा आईचा अपघात झाला आणि हे चक्र थांबलं. त्यानंतर घराची जबाबदारी गौतमीकडे आली. गौतमीला लहानपणापासूनच शिक्षणाची आवड नव्हती. अशातच पैसे कमावण्यासाठी तिने दहावीनंतर शिक्षण सोडलं. त्यानंतर खऱ्या अर्थाने गौतमीच्या संघर्षाची सुरुवात झाली. गौतमीने आठवीत असतानाचं पुणे गाठलं. पुण्यातील एका डान्स अकादमीमार्फत तिने नृत्य करायला सुरुवात केली. बॅक डान्सर म्हणून काम करायला तिने सुरुवात केली. पुढे या क्षेत्राची आवड निर्माण झाल्यानंतर तिने स्वत:चे कार्यक्रम आयोजित करायला सुरुवात केली.

# जैस्वालच्या शतकापुढे नेपाळने टेकले गुडघे!

## » नेपाळवर विजय मिळवत भारत थेट सेमीफायनलमध्ये

**नवी दिल्ली । । वृत्तसंस्था**

**आशियाई क्रीडा स्पर्धा २०२३ मध्ये भारतीय पुरुष क्रिकेटने विजयी सुरुवात केली आहे. पहिल्या सामन्यात भारताने नेपाळचा २३ धावांनी पराभव केला. अव्वल मानांकित संघ असल्याने भारताला उपांत्यपूर्व फेरीत थेट खेळण्याची संधी मिळाली आणि टीम इंडियाने नेपाळचा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना चार गडी गमावून २०२ धावा केल्या.**




प्रत्युत्तरात नेपाळचा संघ नऊ गडी गमावून १७९ धावाच करू शकला. यशस्वी जैस्वालने भारताकडून शतक झळकावले आणि ४९ चेंडूत १०० धावांची शानदार खेळी केली. रवी बिश्नोई आणि आवेश खान यांनी चेंडूवर प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. त्याचवेळी भारताकडून पहिला सामना खेळणाऱ्या रवी साई किशोरने क्षेत्ररक्षणात विक्रम केला. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना चार गडी गमावून २०२ धावा केल्या. यशस्वी जैस्वालने सर्वाधिक १०० धावांचे योगदान दिले. रिंकू सिंगने ३७, ऋतुराज आणि शिवम दुबेने २५-२५ धावा केल्या. नेपाळकडून दीपेंद्र सिंगने दोन विकेट्स घेतल्या. सोमपाल कामी आणि लामिछाने यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. प्रत्युत्तरात नेपाळचा संघ नऊ गडी गमावून केवळ १७९ धावाच करू शकला. दीपेंद्र सिंगने सर्वाधिक ३२ धावा केल्या. संदीप जोरा आणि कुशल मल्लाने २९ धावांचे, कुशल भुरटेलने २८ आणि करणने १८ धावांचे योगदान दिले. त्यामुळे नेपाळचा संघ भारताला टक्कर देण्यात यशस्वी ठरला. भारताकडून रवी बिश्नोई आणि आवेश खान यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. अर्शदीपला दोन आणि आर साई किशोरला एक विकेट मिळाली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत भारताने शानदार सुरुवात केली. यशस्वी आणि ऋतुराज जोडीने पॉवरप्लेमध्ये ६३ धावांची भर घातली. यशस्वी वेगाने धावा करत होता आणि त्याने २२ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याचवेळी ऋतुराज चांगला फॉर्मात नव्हता,२३ चेंडूत २५ धावा करून तो बाद झाला. दीपेंद्र सिंग ऐरीने त्याला रोहितकरवी झेलबाद केले. तिसऱ्या क्रमांकावर आलेला तिलक वर्मा १० चेंडूत दोन धावा करून बाद झाला. जितेश शर्माही पाच धावा करून तंबूत परतला. शिवम दुबेने यशस्वी जैस्वालच्या साथीने भारताची धावसंख्या १५० धावांवर नेली. यशस्वीने ४८ चेंडूंत आठ चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने आपले शतक पूर्ण केले, त्यानंतरच तो बाद झाला. शेवटी, रिंकू सिंग आणि शिवम दुबे यांनी २२ चेंडूत ५२ धावांची नाबाद भागीदारी करत संघाची धावसंख्या चार गड्यांच्या मोबदल्यात २०२ धावांपर्यंत नेली. रिंकू सिंगने १५ चेंडूंत चार षटकार आणि दोन चौकारांच्या मदतीने ३७ धावा केल्या आणि तो नाबाद राहिला. तर शिवम दुबेने १९ चेंडूत नाबाद २५ धावा केल्या. नेपाळकडून दीपेंद्र सिंगने दोन तर सोमपाल आणि संदीपने प्रत्येकी एक विकेट घेतली. २०२३ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना नेपाळची सुरुवात चांगली झाली. संघाला पहिला धक्का २९ धावांवर बसला. अवेश खानने १० धावांवर आसिफ शेखला बाद केले. मात्र, नेपाळचे फलंदाज मोठे फटके खेळत राहिले आणि पॉवरप्ले संपल्यानंतर नेपाळची धावसंख्या एका विकेटच्या मोबदल्यात ४६ अशी झाली. कुशल माला आणि कुशल भुरटेल यांनी झटपट गोल केले. आर साई किशोरने पहिला सामना खेळत कुशल भुरटेलला २८ धावांवर बाद करून भारताला दुसरे यश मिळवून दिले. यानंतर कुशल मालाही २९ धावा करून रवी बिश्नोईचा बळी ठरला. याच षटकात बिश्नोईने नेपाळचा कर्णधार रोहितला बाद करत नेपाळची धावसंख्या ११ षटकांत ७७/४ अशी केली. दीपेंद्र सिंग ऐरी आणि संदीप जोरा यांनी आक्रमक फलंदाजी करत नेपाळला सामन्यात रोखले. १५ चेंडूत ३२ धावा काढणारा ऐरी बिश्नोईचा तिसरा बळी ठरला. तर झोराला अर्शदीपने यशस्वीच्या हातून झेलबाद केले. सोमपाल कामी आणि गुलशन झा काही विशेष करू शकले नाहीत. करणने १८ धावा करत संघाला विजय मिळवण्याचा प्रयत्न केला, पण त्याला फारसे यश आले नाही. अखेरीस नेपाळला १७९ धावांत रोखण्यात भारतीय गोलंदाजांना यश आले आणि सामना जिंकला.

### साई किशोरने विक्रम केला

» या सामन्यात आर साई किशोरने भारताकडून पदार्पण केले. डावखुऱ्या फिरकी गोलंदाजाने या सामन्यात तीन झेल घेत एक खास विक्रम आपल्या नावावर केला. पदार्पणाच्या सामन्यात तीन झेल घेणारा तो पहिला भारतीय ठरला आहे. साई किशोरला फलंदाजीची संधी मिळाली नाही, पण त्याने आपल्या चार षटकांत खूप प्रभावित केले. साई किशोरने चार षटकात २५ धावा देत एक विकेट घेतली. भारतासाठी पहिला सामना खेळत असलेला साई किशोर राष्ट्रगीताच्या वेळी भावूक झाला आणि त्याच्या डोळ्यात अश्रू आले, मात्र सामन्यादरम्यान त्याने आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवत चांगली कामगिरी करत संघाच्या विजयात हातभार लावला.

# सात्त्विक-चिराग, श्रीकांतची आगेकूच

**नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज**

भारताच्या किदम्बी श्रीकांत आणि सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी व चिराग शेट्टी जोडीने आशियाई क्रीडा स्पर्धेतील बॅडिमटनमध्ये अनुक्रमे पुरुष एकेरी व दुहेरीच्या पुढच्या फेरीत आगेकूच केली. श्रीकांतने पुरुष एकेरीच्या सामन्यात व्हिएतनामच्या फाट ले डुकला २९ मिनिटे चाललेल्या सामन्यात २१-१०, २१-१० असे पराभूत करत दुसऱ्या फेरीत आगेकूच केली. २०२१च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या श्रीकांतचा सामना पुढच्या फेरीत कोरियाच्या ली युन जियुशी होईल. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता सात्त्विकसाईराज व चिराग जोडीने पुरुष दुहेरीत हाँगकाँगच्या चो हिन लोंग व लुइ चुन वेइ जोडीला २१-११, २१-१६ असे सरळ गेममध्ये नमवले. जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानी असलेल्या भारतीय जोडीचा सामना आता इंडोनेशियाच्या रोली कार्नाडो व डॅनियल मार्टिनशी होईल. मिश्र दुहेरीत साई प्रतीक व तनीषा क्रॅस्टोने मकाऊच्या लियोंग लोग चोंग व वेंग चि एंगला २१-१८,२१-१४ अशा फरकाने पराभूत केले. आता त्यांची गाठ मलेशियाच्या चेन तांग जि व तो ई वेई जोडीशी पडेल. भारताच्या एम आर अर्जुनला दुखापतीमुळे माघार घ्यावी लागली. तर, रोहन कपूरला ताप येत आहे. अर्जुन आणि ध्रुव कपिला जोडीला जपानच्या ताकुरो होकी व युगो कोबायाशी जोडीविरुद्ध सामना मध्येच सोडावा लागला.

# आणखी एक पंच आणि भारताला सुवर्ण!

## » लवलिना बोर्गोहेनची फायनलमध्ये धडक

**नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भारताची स्टार बॉक्सिंगपटू लवलिना बोर्गोहेनने आशियाई क्रीडा स्पर्धेत महिलांच्या ७५ किलो वजनी गटात अंतिम फेरीत प्रवेश केला. टोकियो ऑलिंपिकमध्ये कांस्य जिंकणाऱ्या लवलिनाने यासह पॅरिस ऑलिंपिकचे तिकीट मिळवले. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने आतापर्यंत १३ सुवर्ण, २४ रौप्य आणि २५ कांस्य अशी ६२ पदके जिंकली आहेत.**



चीनमधील हांगझोऊ येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत लवलिनाने सेमीफायनलमध्ये थायलंडच्या मानेकोन बॅसनचा ५-० असा पराभव केला. निकहत जरीन, प्रीती आणि परवीन हुडा यांच्यानंतर पॅरिस ऑलिंपिकमध्ये स्थान निश्चित करणारी लवलिना ही चौथी भारतीय बॉक्सर ठरली आहे. ओजस प्रवीण देवतळे आणि अभिषेक यांनी पुरुषांच्या तिरंदाजीतील कंपाउंडमध्ये अंतिम फेरीत पोहोचले आहे. त्यामुळे या प्रकारात भारताचे सुवर्ण आणि रौप्यपदक निश्चित झाले आहे. अंतिम फेरी ७ ऑक्टोबर रोजी होणार आहे. तर महिलांच्या वैयक्तीक कंपाउंड प्रकारात भारताच्या ज्योती सुरेखा वेन्नमने अंतिम फेरीत प्रवेश करून पदक निश्चित केले. तिने भारताच्या अदिती स्वामीचा सेमीफायनलमध्ये पराभव केला. आता ज्योतीचे लक्ष्य सुवर्णपदकावर असेल. आज मंगळवारी भारताच्या अर्जुन सिंग आणि सुनील सिंग यांनी कॅनोइंगमध्ये कांस्य पदक जिंकले तर बॉक्सिंगमध्ये प्रिती पवारने ५४ किलो वजनी गटात कांस्य पदक मिळवले. बॅडमिंटनमध्ये भारताचा स्टार खेळाडू एचएस प्रणय आणि पी व्ही सिंधू यांनी प्री क्वॉर्टर फायनलमध्ये प्रवेश केला. प्रणयने मंगोलियाच्या बत्दावा मुंखबातचा २१-९, २१-१२ असा पराभव केला. तर माजी वर्ल्ड चॅम्पियन सिंधूने चीनी तायपैच्या वी चि सूचा २१-१०, २१-१५ असे पराभूत केले.